**ठळक बातम्या**

- मुंबई उपनगरीय रेल्वे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयानं दिली स्थगिती
- ऑपरेशन सिंदूर, बिहार मतदार पुनरिक्षण आणि इतर मुद्दयांवरुन आजही संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ/ कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब
- राज्यसभेत नवनियुक्त सदस्यांचा शपथविधी
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज ब्रिटनचे प्रधानमंत्री केयर स्टार्मर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा
- **आणि**
- फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज कोनेरु हम्पी आणि ली टिंगजी यांच्यात टायब्रेकर / दिव्या देशमुख अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

मुंबई उपनगरीय रेल्वेत २००६ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयाला आज सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यावर आज न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन.के. सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. राज्य सरकारच्या वतीनं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात म्हणणं मांडलं. उच्च न्यायालयाच्या निकालातल्या काही निरीक्षणांमुळे मकोका अंतर्गत प्रलंबित असलेल्या इतर खटल्यांवर परिणाम होऊ शकतो, म्हणून या निर्णयाला स्थगिती द्यावी अशी राज्यसरकारची मागणी त्यांनी

न्यायालयासमोर मांडली. मात्र उच्च न्यायालयाच्या निकालानंतर तुरुंगातून सुटलेल्या आरोपींनी पुन्हा आत्मसमर्पण करावं अशी कोणतीही मागणी नसल्याचं त्यांनी न्यायालयात स्पष्ट केलं. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानं मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थिगिती दिली. तसंच, या सर्व आरोपींना पुन्हा तुरुंगात ठेवण्याची आवश्यकता नाही असं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज आज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेच्या कामकाजाला प्रश्नोत्तराच्या तासाने सुरुवात झाल्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षणासह इतर विषयांवर चर्चा करण्याची मागणी करत काही विरोधक सभागृहाच्या हौद्यात उतरले. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना आपापल्या जागी जाऊन सभागृहाचं कामकाज सुरू करावं, असं आवाहन केलं. मात्र, विरोधकांचा गदारोळ सुरूच राहिल्याने बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केलं. या गदारोळातच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सीएनजी कव्हरेज संबंधित प्रश्नाचं उत्तर दिलं.

**होल्ड... बाईट - हरदीप सिंग पुरी**

जवळपास संपूर्ण देशात आता स्वच्छ ऊर्जेचा वापर होत असल्याचं पुरी यांनी या उत्तरावेळी सांगितलं. सीएनजी आणि पीएनजीसह सर्व प्रकारच्या ऊर्जा संक्रमणासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचंही पुरी यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यसभेच्या कामकाजाला आज सकाळी ११ वाजता सुरुवात झाली. उपसभापती हरिवंश यांनी राज्यसभेचे नवनियुक्त सदस्य उज्ज्वल निकम यांना शपथ दिली. निकम यांनी मराठीतून शपथ घेतली. आपला कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या

सहा निवृत्त सदस्यांनाही सभागृहात निरोप देण्यात आला. बिहारमध्ये मतदार यादी पुनरिक्षण आणि देशभरातल्या सायबर फसवणुकीसह विविध मुद्द्यांशी संबंधित ३० स्थगन प्रस्ताव उपाध्यक्ष हरिवंश यांनी फेटाळून लावले आणि प्रश्नोत्तराचा तास पुकारला. परंतु विरोधी पक्ष सदस्यांनी त्यांच्या मुद्द्यावर घोषणाबाजी सुरू केली. त्यावर हरिवंश यांनी कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन करूनही गदारोळ चालूच राहिल्यानं राज्यसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या चौथ्या दिवशी विरोधकांनी संसद भवन परिसरात बिहारच्या मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रियेविरोधात निदर्शनं केली. या निदर्शनात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, प्रियांका गांधी यांच्यासह इंडिया आघाडीचे खासदार सहभागी झाले होते. संसदेत विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलू दिलं जात नसल्याचा आरोप काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी केला. तर, सत्ताधारी पक्ष हा लोकशाहीचा नाश करत असल्याचा आरोप काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी यावेळी केला.

<><><><><>

देशभरात आज प्राप्तिकर दिवस साजरा केला जात आहे. देशाच्या कर प्रशासनाची उत्क्रांती आणि नागरिक केंद्रिय व्यवस्था उभारण्याच्या सरकारचे प्रयत्न अधोरेखित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

सर जेम्स विल्सन यांनी १८६० मधे देशात प्राप्तिकर लागू केला. यामुळे १९२२ च्या प्राप्तिकर कायद्याचा पाया घातला गेला.

गेल्या आर्थिक वर्षात ९ कोटीपेक्षा जास्त प्राप्तिकर विवरणपत्रं दाखल झाली, यातून संभाव्य करदात्यांचे परिश्रम दिसून येतात.

<><><><><>

प्रसारभारतीच्या पीबी शब्द या व्यासपीठावर नोंदणी करण्याचं आवाहन देशातली सर्व वर्तमानपत्रं, नियतकालिकं आणि दूरचित्र वाहिन्यांना करण्यात आलं आहे. या वृत्तसेवेत प्रसार भारतीच्या छापील बातम्या आणि दृकश्राव्य साहित्य विनामूल्य घेऊन वापरता येतील. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी प्रसारभारतीच्या विश्वासार्ह बातम्या आणि माहिती विविध नियतकालिकांमधून प्रसारित करण्यावर भर दिला आहे. गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यात सुरु झालेल्या पीबी शब्द या व्यासपीठाद्वारे दररोज ४० हून अधिक विविध क्षेत्रातल्या ८०० हून अधिक बातम्या विविध भाषांमध्ये प्रसारित होत असतात. या व्यासपीठावरुन अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे थेट प्रसारणही उपलब्ध असतं. या बरोबरच प्रसारभारतीकडे विविध घटनांचा समृद्ध ठेवा असून त्याचाही वापर नियतकालिकांना आणि वाहिन्यांना करता येणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ब्रिटनचे प्रधानमंत्री केयर स्टार्मर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. या भेटीदरम्यान भारत आणि इंग्लंड धोरणात्मक संबंधांना नवी गती देण्यावर चर्चा होईल, तसंच ब्रिटनबरोबर मुक्त व्यापार कराराला औपचारिक रुप देण्यात येईल.

प्रधानमंत्री मोदी काल दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी लंडनला पोहोचले तेव्हा रंगीबेरंगी पोषाखातल्या भारतीय समुदायानं त्यांचं जल्लोषात स्वागत केलं. मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात लंडनमधल्या भारतीय समुदायानं केलेल्या स्वागताबद्दल आभार व्यक्त केले. ही भेट दोन्ही राष्ट्रांमध्ये आर्थिक भागीदारी वाढवण्यात महत्त्वाची ठरेल. समृद्धी, विकास आणि रोजगार निर्मितीला चालना देणं, यावर लक्ष केंद्रीत असेल, जागतिक प्रगतीसाठी भारत-ब्रिटनची मजबूत मैत्री आवश्यक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या कृत्रिम बुद्धीमत्ता धोरणाची पुनर्बांधणी करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कृत्रिम बुद्धीमत्ता कृती कार्यक्रम जाहीर केला आहे. अमेरिकेला कृत्रिम बुद्धीमत्ता निर्यातदार बनवण्यासाठी ट्रम्प यांनी तीन कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी केली. एआय सुपर कॉम्प्युटर्सच्या निर्मितीसाठी पर्यावरणीय नियम आणि अटीत कपात करणं हा या कार्यक्रमाचा हेतू आहे. क्रांतीकारक तंत्रज्ञान विकसित करण्याची शर्यत जगात सुरू असल्याचं ट्रम्प यांनी वॉशिंग्टन इथं कृत्रिम बुद्धीमत्ता परिषदेत म्हटलं.

**<><><><>**

जॉर्जियात बटुमी इथं सुरु असलेल्या फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक २०२५ च्या उपांत्य फेरीत को◌ेनेरु हम्पी आणि ली टिंगजी यांच्यात आज टायब्रेकर होणार आहे. काल त्यांच्यातला पहिला सामना अनिर्णित राहिला. भारताच्या दिव्या देशमुखनं काल चीनच्या टॅन झोंगी हिला हरवून अंतिम फेरीत स्थान मिळवलं. पहिला सामना अनिर्णित राहिल्यानंतर दुसऱ्या सामन्यात विजय मिळवून, दिव्यानं २०२६ मध्ये होणाऱ्या कँडिडेट्स स्पर्धेतही स्थान मिळवलं आहे आणि तिचा पहिला ग्रँड मास्टर निकषही पार केला आहे. १९ वर्षांची दिव्या फिडे महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

**<><><><>**

चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधू हिने काल महिला एकेरी प्रकाराच्या उपउपांत्यपूर्व फेरीत जपानच्या टोमोका मियाझाकी हिचा पराभव केला. महिला एकेरीच्या अन्य एका लढतीत भारताच्या उन्नती हुडा हिने स्कॉटलंडच्या क्रिस्टी गिलमोर हिला २-० अशा गुणफरकानं हरवलं. उपांत्यपूर्व फेरीत आज सिंधू आणि उन्नती यांच्यात सामना होईल. पुरुष दुहेरी प्रकारात सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने उपउपांत्यपूर्व फेरीत

जपानच्या केनिया मित्सुहाशी आणि हिरोकी ओकामुरा यांचा सरळ गेममध्ये पराभव केला. आज उपांत्यपूर्व फेरीत दोघांची लढत इंडोनेशियाच्या लिओ रॉली कार्नांडो आणि बगास मौलाना यांच्याशी होईल.

<><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथा सामन्याच्या पहिल्या दिवशी काल भारतानं ४ बाद २६४ धावा केल्या. साई सुदर्शननं ६१ तर यशस्वी जयस्वालनं ५८ धावा केल्या. रवींद्र जडेजा आणि शार्दूल ठाकूर आज खेळ पुढे सुरु करतील.

<><><><>

अमरनाथ यात्रेसाठी आज जम्मू इथल्या शिबीरांतून साडेतीन हजार भाविकांची नवी तुकडी रवाना झाली. यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, यात्रा सुरू झाल्यापासून गेल्या २१ दिवसांत ३ लाख ४२ हजारापेक्षा जास्त भाविकांनी अमरनाथ यात्रा पूर्ण केली असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान सध्या दशनामी आखाड्यात वास्तव्याला असलेली छडी मुबारक ४ ऑगस्ट रोजी अमरनाथ मंदिरासाठी प्रस्थान करेल, ती ९ तारखेला मंदिरात पोहचल्यावर या यात्रेचा अधिकृत समारोप होईल, असंही या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><>

कर्नाटकच्या किनारी भागात, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. दिल्ली, चंडीगढ, हरियाणा, जम्मू - काश्मीर, बिहार, गुजरात आणि ईशान्येकडच्या राज्यांमध्ये येत्या २-३ दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//